## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२६ (प्रतिनिधी) :कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात संडे ऑन सायकलिंग या उपक्रमांतर्गत भव्य सायकल रॅलीचे आयोजन रविवार दिनांक २४ मे २०२६ रोजी करण्यात आले. सकाळी ७ वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून सुरू झालेल्या या रॅलीत जळगाव सायकलिस्ट ग्रुपच्या सुमारे ४० सायकलपटूंसह विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

या सायकल रॅलीला प्राध्यापक डॉ. रत्नमाला बेंद्रे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ करण्यात आला. यावेळी क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील तसेच प्राध्यापक डॉ. एस. टी. बेंद्रे यांनी उपस्थितांना सायकल चालविण्याचे आरोग्यदायी फायदे, पर्यावरण संवर्धनासाठी सायकलीचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैलीसाठी नियमित व्यायामाची गरज याविषयी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी जळगाव सायकलिस्ट ग्रुपचे अध्यक्ष निलेश चौधरी, उपाध्यक्ष रुपेश महाजन तसेच धर्मादाय उपायुक्त मोहन गाडे यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.उपक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले. " संडे ऑन सायकलींग" या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही प्रभावीपणे पोहोचत असल्याची भावना सहभागींकडून व्यक्त करण्यात आली.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २६ मे, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता